महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ ऑटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅंडजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ११३ वा | शनिवार, दि.२९ नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# नगर विकास निधीच्या तिजोरीच्या चाव्या आमच्याकडे आहेत म्हणणाऱ्यांनी तिजोरीचे मालक भाजपा आहे हे ध्यानात घ्यावे- ना. जयकुमार गोरे





**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत समन्वयकातून भूमिकेतून आज महाराष्ट्राचा सर्वच क्षेत्रात विकास होऊन आपल्या राज्याची भरभराट होत आहे. त्यामुळे येत्या काळात मोहोळच्या सर्वांगीण विकासाची उत्तुंग झेप घेण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार शितल सुशील क्षीरसागर आणि अन्य सर्व भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा.चार दिवसांपूर्वी एका अन्य पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सत्तेतील बडे नेते म्हणाले की सत्तेच्या तिजोरीच्या चाव्या आमच्याकडे आहेत मी मोहोळच्या विकासाचे काय करायचे ते पाहतो. अहो सत्तेच्या तिजोरीच्या चाव्या जरी तुमच्याकडे असल्या तरी या तिजोरीची मालकी आमच्या भाजपाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडणवीस यांच्याकडे आहे. त्यामुळे शहरातील जनतेने निश्चितपणे ना.देवाभाऊंच्या मार्गदर्शनाखाली मोहोळच्या विकासासाठी भाजप सोबतच राहावे असे आवाहन राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार भाऊ गोरे यांनी मोहोळ येथे केले.

मोहोळ येथे भारतीय जनता पक्षाच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार शितल सुशील क्षीरसागर यांच्या आणि भाजपच्या सर्व वीस अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ छत्रपती संभाजीराजे महाराज चौकात आयोजित भव्य प्रचार सभेमध्ये मार्गदर्शन करताना ना. जयकुमारभाऊ गोरे बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर भाजपचे नेते सदाभाऊ खोत मुंबई अल्पसंख्याक मोचार्चे अध्यक्ष वसीम आर. खान, भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने, ज्येष्ठ नेते नागनाथभाऊ क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष शशिकांतनाना चव्हाण, सोलापूर शहराध्यक्ष रोहिणीताई तडवळकर, शहाजीभाऊ पवार, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शीतल सुशील क्षीरसागर, निवडणूक प्रभारी सुशील क्षीरसागर यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री ना. गोरे म्हणाले की आज भाजपाच्या विरोधात ज्यांनी पॅनल लावला आहे त्या पॅनलचे प्रमुख माज्याकडे येऊन दोन-तीन तास

## मोहोळच्या अंतर्गत रस्ते साठी २०० कोटी

## मुख्य रस्त्यासाठी १२ कोटी तर संपूर्ण शहर सीसीटीव्ही करण्याचे दिले भर सभेत आश्वासन

### लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाच्या भाजपा उमेदवार शितल क्षीरसागर यांच्यासह भाजपच्या सर्व वीस उमेदवारांच्या प्रचारार्थ मोहोळ मध्ये भाजपची मोठी सभा



तुम्ही नगराध्यक्षपदी शीतल क्षीरसागर यांना विजयी करून नगरपरिषदेच्या सत्तेची सूत्रे आमच्या भाजप पक्षाकडे द्या. आठ दिवसात मोहोळ मधील अंतर्गत रस्त्यासाठी २०० कोटी मेन रोडच्या मजबूत बांधणीसाठी १२ कोटी तर अंतर्गत सीसीटीव्हीसाठी भरीव निधी देतो. मी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार क्षीरसागर यांचे भाषण दोन वेळा ऐकले मला खूप समाधान वाटले.कारण पक्षाने अशा कार्यक्षम आणि सुशिक्षित व्यक्तिमत्त्वाला उमेदवारी देऊन मोहोळच्या सर्वांगीण विकासासाठी खूप धोरणात्मक निर्णय घेतला आहे तुमच्या सर्वांची साथ आणि मार्गदर्शन मोहोळच्या भविष्यातील सर्वांगीण विकासाची सूत्रे ठरवणार आहे.

**ना. जयकुमारभाऊ गोरे,** पालकमंत्री सोलापूर

बसत होते आणि विनंती करून म्हणत होते एखादा कोटीचा तरी निधी द्या. चार दिवसापूर्वी मोहोळच्या विद्यमान आमदारांनी भरसभेतच कबुली दिली की मला पाच कोटी रुपयांच्या आमदार निधी व्यतिरिक्त एक रुपयांचाही निधी मिळाला नाही. आता मला सांगा की जे आमदाराला पाच कोटी पेक्षा जास्तीचा निधी मिळवु शकत नाही त्या आमदारांच्या भरोशावर भाजपच्या विरोधातील लोक पॅनलची निर्मिती करून कोणत्या नीधीचा भरोशावर विकासासाठी मत मागत आहेत याबाबत शहरवासीयांनी जरा गांभीर्याने विचार करावा

यावेळी जेष्ठ नेते सदाभाऊ खोत यांनी आपल्या भाषणातून भाजपाने सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपंचायत जिंकून विजयाचे खाते उघडले आहे. आता मोहोळच्या जनतेने शीतल क्षीरसागर यांना विजयी करून भाजपाच्या विकासधारेमध्ये सहभागी व्हावे. नामदार जयकुमार गोरे हे अत्यंत कार्यक्षम आणि कर्तव्यदक्ष पालकमंत्री सोलापूर जिल्ह्याला लाभले आहेत. आम्हाला देखील निधी मागायला त्यांच्याकडे जावे लागते. तुमच्या जिल्ह्याला असे पालकमंत्री असल्यामुळे तुम्हाला मुख्यमंत्री देवाभाऊंच्या माध्यमातून सहजरित्या शहराच्या विकासासाठी आवश्यक असणारा निधी मिळू शकेल असे सदाभाऊ खोत आवर्जून म्हणाले.

यावेळी मुंबई अल्पसंख्याक मोर्चा भाजपाचे अध्यक्ष वसीम आर खान म्हणाले की भाजपा हा सर्व समाजाला सर्वधर्माच्या सर्व जातीच्या समाज बांधवांना सोबत घेऊन जाणारा पक्ष आहे. ठराविक धर्माबद्दल चुकीच्या पद्धतीने नॅरेटिव्ह पसरवत विरोधी पक्षांनी बऱ्याचदा स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र भाजपाने हा डाव हाणून पाडत सबका साथ सबका विकास या धोरणाने प्रत्येक धमार्चा आदर सन्मान करत त्यांना विकासाच्या प्रवाहात सहभागी करून देशांतर्गत भाईचारा जपला आहे. त्यामुळे सर्व अल्पसंख्याक समाजातील व सर्वधर्मीय समाज बांधवांनी मोहोळच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातील विकासाच्या दृष्टीने धोरणात्मक विचार करत भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार शीतल क्षीरसागर यांना मोठ्या बहुमताने विजयी करावे असे आवाहन यावेळी वसीम आर. खान यांनी केले.

यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शितल क्षीरसागर, निवडणूक प्रभारी सुशील क्षीरसागर, तालुकाध्यक्ष सतीशआप्पा काळे यांनी आपल्या मनोगत आतून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना मोठ्या बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.

# प्रभाग 8 मध्ये जेष्ठ शिवसेना नेते दिपक मेंबर गायकवाड यांचा शब्द प्रमाण मानत शिवसैनिकांनी केला शिवनिर्धार

## मशाल चिन्हावर नागेश थिटे यांना विजयी करण्यासाठी प्रभाग वासियांचा उस्फुर्त प्रतिसाद



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राजकीय दृष्टया चर्चेत असलेल्या प्रभाग क्रं आठ मधील राजकीय वातावरण शिवसेना उबाठा पक्षाने अत्यंत ताकदीने ढवळून काढत सर्व-सामान्यांची अस्मिता असलेले मशाल चिन्ह घरोघरी पोहोचविले आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेद्वार उज्वला कांबळे यांचे होमग्राऊंड असलेल्या या प्रभागातून शिवसेनेने नागेश थिटे आणि शबाना शेख यांना उतरविले आहे. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात जेष्ठ नेते दिपक गायकवाड, महिला आघाडीच्या नेत्या सिमाताई पाटील यांनी मशाल पदयात्रेच्या माध्यमातून प्रभागतील माहोल मोठया प्रमाणात बदलवून टाकला आहे. त्यामुळे शिवसेनेचे युवा नेते नागेश थिटे आणि शबाना शेख यांच्या प्रचाराचे पारडे चांगलेच जड होऊनया प्रवर्गातील विजयाची मशाल निर्णायक रित्या प्रज्वलित झाली आहे. नागेश थिटे हे प्रभागातील सर्व-सामन्यांच्या संपर्कातील लोकप्रिय चेहरा ठरल्याने मनमिळाऊ आणि निर्मळ भावनेच्या या उमेद्वारास मतदारांनी केवळ त्यांच्या स्वभावामूळे स्विकारले आहे. त्यामुळे नागेश थिटे यांचा विजय आता निष्चित झाला आहे. त्यांच्या प्रचारासाठी सोमनाथ पवार, डॉ. संग्राम गायकवाड, जिब्राईल शेख, बिलाल शेख, सोपान इंगळे यांच्यासह सर्वांनी आहोरात्र परिश्रम सुरू ठेवले आहे.

या प्रभागाचे मार्गदर्शक माजी ग्रा.पं. सदस्य स्वर्गीय दिवंगत नेते रामदास नाना थिटे यांच्या मनातील सर्वांगीण विकासाचे स्वप्न पुर्ण करण्यासाठीच नागेश थिटे या प्रभागातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. प्रभागातील स्थानिक चेहरा असल्यामुळे थिटे यांच्या रूपाने 24 तास उपलब्ध होणारा, सामान्यांचे प्रश्न जागेवर सोडविणारा दक्ष नगरसेवक उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या प्रभागातील सर्व-सामान्य जनतेने निवडणुक हाती घेत नगराध्यक्षपदी उज्वला कांबळे तर नगरसेवक पदी नागेश थिटे आणि शबाना शेख यांना निश्चित केले आहे.

# तीन दशकापासून विकासाची परंपरा असलेल्या शिवसेना उबाठा पक्षाला शहरवासियांनी सर्वांगीण विकासासाठी संधी द्यावी

## लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाच्या उबाठा पक्षाच्या उमेदवार उज्वला अमर कांबळे यांचे आवाहन

### संपूर्ण शहरात शिवसेना उबाठा पक्षाचा प्रचार अंतिम टप्प्यात

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** आपल्या सर्वांच्या मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबर गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या मुलभूत सोयी-सुविधांच्या प्रश्नावर कायम स्वरूपी विकासात्मक तोडगा काढण्यासाठी लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाच्या निडणुकीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेद्वारी प्राप्त करत मी निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहे रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, वीज, स्वच्छता या प्रश्नांना प्राधान्य देण्याबरोबर महिला सुरक्षिततेवरती माझा भर राहील अशी ग्वाही लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाच्या शिवसेना उबाठा पक्षाच्या अधिकृत उमेद्वार उज्वला अमर कांबळे यांनी प्रचारा दरम्यान माध्यमांशी बोलताना दिली. शिवसेना उबाठा हा स्थानिक अस्मितेला सर्वोच्च महत्व देणारा विकासाभिमुख पक्ष असून याच पक्षाची उमेद्वार म्हणून मला आणि सर्व उमेद्वारांना शहरावासिय मतदार मोठया मताधिक्यांनी विजयी करतील असा विष्वासही यावेळी उज्वला अमर कांबळे यांनी व्यक्त केला.



जेष्ठ नेते दिपक गायकवाड यांचे मोहोळ शहराच्या विकासात्मक जडणघडणीमध्ये मोठे योगदान आहे. महिला आघाडीच्या नेत्या सिमाताई पाटील यांनी सरपंच पदाच्या कालावधीत ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मोठी विकास कामे करत शिवसेना पक्ष हा विकासाभिमुख पक्ष असल्याचे दाखवून दिले आहे. गत नगर परिशद निवडणुकीत सर्वात जास्त जागा या शिवसेना पक्षालाच मिळाल्या होत्या. तर सर्वात जास्त मतदानही आपल्या शिवसेना उबाठानेच खेचून घेतले होते त्यामुळे यावेळीही विकासाच्या मुद्दयावर शिवसेनेच्या मशालीला शहरवासियांनी प्राधान्य देऊन मला व सर्व शिवसेना उबाठाच्या उमेद्वारांना मोठया मताधिक्याने विजयी करावे.

**- उज्वला अमर कांबळे**
लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाच्या उबाठा पक्षाच्या उमेदवार



आ. राजू खरे, जिल्हाप्रमुख गणेश दादा वानकर आमच्या परिवाराचे मार्गदर्शक तथा जेष्ठ नेते दिपक मेंबर गायकवाड, महिला आघाडीच्या नेत्या सिमाताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने सर्व शहर वासियांसाठी संपर्क साधत असून त्यामध्ये अत्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून संपुर्ण शहरातील प्रभागातील शिवसेना उबाठा पक्षाच्या उमेद्वारासमवेत डोअर टू डोअर प्रचारामध्ये सर्व-सामान्य महिला भगीनींचे प्रष्न जाणून घेतले त्या प्रश्नांची सोडवणूक या निवडणुकीत विजयी होऊन करण्यासाठी मी वचनबध्द आहे. रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, वीज, स्वच्छता या प्रष्नांना प्राधान्य देण्याबरोबर महिला सुरक्षिततेवरती माझा भर राहील असेही यावेळी उज्वला अमर कांबळे यांनी स्पष्ट केले.

# प्रभाग 10 मधील प्रचाराच्या अंतिम टप्प्यात देखील मेजर तानाजी माने यांचा प्रतिसाद निर्णायक स्वरूपात कायम

## विकासासोबत राहण्यासाठी मतदारांनी निवडला आहे भाजपचा धोरणात्मक पर्याय

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-**प्रभाग क्रमांक दहा मधील भाजपाचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून आता निश्चितपणे भाजपाचा या प्रभागातून विजय होणार असल्याचा दावा उमेदवार मेजर तानाजी माने यांचे समर्थक करताना दिसत आहेत. मेजर तानाजी माने यांना ज्येष्ठ नेते राजन पाटील यांनी संधी देत या प्रभागातील जागा पक्षाच्या ताब्यात ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.माने परिवार हा या प्रभागातील एक सुशिक्षित आणि व्यवसाय आणि शेतीदृष्ट्या संपन्न परिवार आहे. त्यामुळे राजकारणाच्या माध्यमातून कोणतीही फायद्याची अपेक्षा न ठेवता अगदी निरपेक्ष भावनेने या प्रभागाची सेवा करू शकणारा परिवार असल्याची बाब ध्यानात घेऊनच ज्येष्ठ भाजप नेते राजन पाटील यांनी या परिवारावर असलेला विश्वास सार्थ ठरवत यांना उमेदवारीची



संधी दिली. अनगरकर -पाटील परिवार आणि भाजप पक्षाच्या मार्गदर्शनाखाली या प्रभागाचा पुढील विकासाचा टप्पा पूर्ण करण्यासाठी या निवडणुकीत विजयी होणे महत्त्वाचे आहे.त्यामुळे माने परिवार आणि भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते एकदिलाने प्रचाराचा प्रभागातील जोर चांगलाच वाढवत आहेत. आणि त्यामध्ये त्यांना सकारात्मक प्रतिसाद देखील मिळत आहे.

प्रभाग क्रमांक दहा हा गेल्या अनेक वर्षापासून चा भाजपचा किल्ला ताब्यात ठेवण्यासाठी भारतीय जनता पक्षाने या प्रभागातून मेजर तानाजी माने यांना उमेदवारी देत या प्रभागातील सर्वपक्षीय विरोधकांसमोरचे आव्हान कायम ठेवले आहे. मेजर तानाजी माने यांची सुपुत्र डॉ. किरण माने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या प्रभागातील प्रचाराचा शेवटचा टप्पा आता जवळपास पूर्ण करत आणला आहे. या प्रचाराच्या अंतिम टप्प्या दरम्यान त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

माने वस्ती, गाढवे वस्ती बरोबर मोहोळ शहराच्या दक्षिण भागातील कुरुल रस्त्याच्या पूर्वेकडील भागातील प्रत्येक नगरामध्ये मेजर तानाजी माने आणि प्रशांत गाढवे यांच्या परिवारातील सदस्यांनी फिरून प्रत्येक सर्वसामान्यांशी संपर्क साधला आहे. देशातील आणि राज्यातील भाजपची विकास धोरणे पटवून देत भाजपच्या उमेदवाराचा विजय झाल्यानंतर वरिष्ठ स्तरावरून प्रशासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करता येऊ शकते ही बाब त्यांनी प्रत्येकाला मनोमन पटवून दिली आहे.

# प्रभाग आठ मध्ये शिवसेना शिंदे पक्षाचे स्थानिक उमेदवार दौलतराव तथा बंडु देशमुख यांच्या प्रचारातील मुसंडी कायम

## शिवसेना शिंदे पक्षाने प्रत्येक घरात आणि घरातील प्रत्येकापर्यंत धनुष्यबाण चिन्ह पोहोचविले

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहरातील प्रभाग क्रं. आठ मध्ये शिवसेना शिंदे पक्षाचे सर्व-साधारण प्रवगार्चे उमेद्वार दौलतराव तथा बंडू देशमुख यांचा आणि ओबीसी महिला प्रवगार्तील उमेदवार राणीताई गोडसे यांचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून या प्रचारादरम्यान शिवसेना शिंदे पक्षाच्या या दोन्ही उमेदवारांना प्रभागातील जनतेने उत्स्फुर्त प्रतिसाद दिला असून यंदा या प्रभागावर निश्चितपणे शिवसेना शिंदे पक्षाचा प्रभाव चालून दौलतराव तथा बंडू देशमुख यांचा आणि राणीताई गोडसे विजय निश्चित मानला जात आहे.

स्थानिक उमेद्वारीच्या मुद्दयाला हात घालत निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले बंडू देशमुख यांनी प्रभागातील सर्व-सामांन्याशी नम्रपणे संवाद साधत अद्यावत प्रचारतंत्राचा वापर केला आहे. जनसंवाद दौरा त्याचबरोबर प्रभाग बैठका, पदयात्रा, मोटार सायकल रॅली, डोअर टू डोअर प्रचाराच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक घरापर्यंत आणि घरातील प्रत्येकापर्यंत धनुश्यबाण पोहोचविले. केवळ कागदावरती कोटयावधी रूपयांचा निधी आणल्याच्या ढोंगी विकासाच्या विरोधातील प्रभागातील सर्व-सामान्यांचा संताप प्रचारादरम्यान मतदारातून प्रचंड प्रमाणात बाहेर पडत असल्याने याचा फायदा दौलतराव तथा बंडु देशमुख व राणीताई गोडसे यांना होणार आहे.



शहराच्या पश्चिम भागातील आमच्या या मोक्याच्या प्रभागातील निवडणुकीत स्थानिक उमेदवार म्हणून शिवसेना शिंदे पक्षाकडून उमेदवारी घेऊन या निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहे. प्रचारा दरम्यान प्रभागातील मतदार बंधु-भगीनींनी शिवसेना शिंदे पक्षाच्या विकासाच्या धोरणाला पाठिंबा व्यक्त करत निश्चितपणे आम्हाला मताचे पवित्र दान आम्हाला करण्याचा निर्णय घेतला आहे. आ. राजू खरे, शिवसेना ओबीसी पक्षाचे राज्याचे प्रमुख नेते रमेश बारसकर, जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, जेष्ठ नेते पद्माकर आप्पा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली धनुश्यबाण चिन्हाच्या माध्यमातून विजयी होऊन प्रभागाची सेवा करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.



## संपादकीय

# सिंहस्थ कुंभ सार्थकी लागेल का?

साधुग्रामसाठी तपोवन भागातील १७०० झाडांवर कुऱ्हाड चालवण्याच्या महापालिकेच्या निर्णयामुळे नाशिककर संतापले आहेत. हा संताप म्हणजे पर्यावरणवादी आंदोलनजीवींचा अतिरेकी गळेकाढूपणा आहे, असे म्हणून सोडून देता येणार नाही. सिंहस्थ कुंभमेळा काही अचानक भरत नाही. या शहरात दर काही वर्षांनी या सोहळ्यानिमित्त लाखो साधु-महंत-भाविक-पर्यटक येतातच. त्यांना लागणाऱ्या सुविधांचा अंदाज बांधणे आणि त्यादृष्टीने पावले उचलणे अशक्य नाही. तरीही साधुग्रामसाठी जागाच नाही, याचा साक्षात्कार अवघे वर्ष शिल्लक असताना सरकारला होतो आणि एखादे अतिक्रमण हटवावे अशा प्रकारे १७०० झाडे तोडण्याचा निर्णय घेऊन नाशिक महापालिका मोकळी होते, हे स्वतःला पर्यावरणप्रेमी न म्हणवणाऱ्यांनाही रुचणारे नाही.

तपोवन ही ज्या मंदिरावर पंतप्रधानांनी नुकताच भक्तिभावाने धर्मध्वज फडकवला, त्या श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झाल्याची श्रद्धा असलेली भूमी. संबंधित १७०० झाडे याच भूमीवर आहेत. या निर्णयामुळे नाशिककरांत खळबळ माजल्यानंतर आम्ही केवळ परदेशी प्रजातींची झाडे तोडू, १० वर्षांवरील झाडे तोडली जाणार नाहीत, झाडांवर ज्या खुणा केल्या आहेत त्या गणतीसाठी आहेत वगैरे सारवासारव पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांनी केली असली, तरीही त्याने स्थानिकांचे समाधान झाले नाहीच. जांभूळ, निंब, चिंचेच्या झाडांवरही खुणा करण्यात आल्या आहेत आणि त्या गणतीसाठी नसून त्यावर कुऱ्हाडच चालवली जाणार आहे, असे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे.

साधुग्रामसाठी झाडे तोडण्याशिवाय पर्याय नाही हा राज्य सरकारचा युक्तिवाद तयारच आहे. कुंभमेळा मंत्रीपदाची धुरा सांभाळणारे गिरीश महाजन म्हणतात की, तोडल्या जाणाऱ्या प्रत्येक झाडामागे अन्यत्र १० झाडे लावली जातील. अशा भरपाईचे काय होते हे सर्वच जाणून आहेत. शिवाय आपल्या अंगाखांद्यांवर शेकडो कृमी-कीटक-पक्ष्यांना आश्रय देणाऱ्या, पाळेमुळे खोलवर रुजलेल्या झाडाची तुलना बाह्य संरक्षणावर अवलंबून असलेल्या १० रोपट्यांशी करणे पूर्णपणे अतार्किक आहे. बरे ही झाडे नेमकी कुठे लावणार हेही स्पष्ट करण्यात आलेले नाही. या बाबतीत सरकारचे 'आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी' धोरण सर्वांना ज्ञात आहेच. जे सरकार मुंबई मेट्रोसाठी झाडे तोडून गडचिरोलीत झाडे लावल्याचा दावा करते किंवा निकोबारमधील वृक्षतोडीची भरपाई हरियाणात करू पाहते, त्याच्याकडून काय अपेक्षा करणार?

दोन माणसांच्या कवेत मावणार नाही, एवढे प्रचंड मजबूत खोड असलेली अनेक झाडे तपोवनात आहेत. स्थानिकांच्या लेखी हा पर्यावरणीय वारसा आहे. दोन वर्ष (ऑक्टोबर २०२६ ते जुलै २०२८) चालणाऱ्या धार्मिक सोहळ्यासाठी हा वारसा कायमचा नष्ट करणे त्यांना मान्य नाही. त्यामुळे नाशिक पालिकेच्या या निर्णयावर ९०० हून अधिक हरकती नोंदवण्यात आल्या. या संदर्भात नुकत्याच झालेल्या जनसुनावणीतही स्थानिकांनी आपल्या संतापाला वाट करून दिली.

सामान्य माणसाने एक झाड तोडले तर त्याच्यावर कठोर कारवाई होते. असे असताना सिंहस्थासाठी शेकडो झाडे तोडणे कोणत्या नियमात बसवण्यात येणार आहे? आपल्या देशातील विरोधाभास असा की येथील बहुसंख्यांच्या धर्मात वृक्षवल्ली, प्राणीमात्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र येथील समाज आणि या समाजाने निवडून दिलेली सरकारे ही नेहमीच या दोन्ही घटकांची उपेक्षा करत आली आहेत. असे असले तरी, विकासाच्या नावाखाली झाडांची कत्तल करण्यात आणि प्राणीमात्रांचे अधिवास हिरावून घेण्यात आजच्या सत्ताधाऱ्यांचा हात याआधीची कोणतीही सरकारे धरू शकणार नाहीत. मुंबई मेट्रोसारखे प्रकल्प असोत, चारधामसारखे महामार्ग वा हसदेवसारखे खाण प्रकल्प, त्यांच्या वाटेत येणारी शेकडो वर्षांची वनसंपदा बिनदिक्कत सपाट करून तथाकथित विकासाचा मार्ग मोकळा करून दिला जातो.

झाडे तोडण्याऐवजी काही पर्याय निघू शकतो का, याचा विचार करण्याची फारशी तसदी घेतली जात नाही. हेच नाशिकच्या सिंहस्थातही होते आहे. वृक्षतोडीचे इथले पाप जणू रामकुंडातील स्नानाने धुऊन निघणार आहे. सिंहस्थ कुंभ महत्त्वाचाच; कारण संस्कृतीच्या वहनाचे हे एक माध्यम. मात्र या मेळ्यासाठी वृक्षतोड हा धार्मिक मुद्दा नाही. तो निव्वळ प्रशासकीय आळशीपणाचा आणि नगर नियोजनातील कल्पकतेच्या, दूरदृष्टीच्या अभावाचा आणखी एक नमुना आहे. नाशिक ही सिंहस्थ कुंभमेळ्याची नगरी असताना नगर नियोजनात साधूंच्या निवासाची सोय करावी, अशी गरज सरकारला का भासत नाही? आला कुंभ की तोडा झाडे, असाच पायंडा यापुढेही पडणार असेल, तर सिंहस्थ कुंभ सार्थकी लागेल का?

# कार्यकर्ता ते नेता होण्याच्या निवडणुका...

सध्या महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या—अर्थात नगरपंचायत—निवडणुका जाहीर झाल्या आहेत. पुढील दोन ते तीन महिन्यांत जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच महानगरपालिकांच्या देखील निवडणुका होणार आहेत. साधारणपणे या निवडणुका कार्यकर्त्यांच्या निवडणुका म्हणून ओळखल्या जातात. तरीदेखील घराणेशाहीमुळे तळागाळातून प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळवताना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते.

१९५० च्या मूळ राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वातील कलम ४० मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, 'राज्याने ग्रामपंचायती स्थापन करून त्या स्वराज्य संस्था म्हणून कार्य करू शकतील आणि इतर आवश्यक अधिकार त्यांना द्यावेत.' १९५० च्या दशकात देशातील विविध भागांत पंचायत राज संस्था अस्तित्वात आल्या आणि त्या कमीअधिक कार्यक्षमतेने कार्य करत राहिल्या. राजीव गांधी पंतप्रधान असताना स्थानिक स्वराज्य संस्थांची घटनात्मक हमी असावी, असे सरकारला वाटू लागले. त्यातून १९९२ मध्ये ७३वी आणि ७४वी घटनादुरुस्ती करून संबंधित कलमे संविधानाच्या ९वा आणि ९अ भागात समाविष्ट करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांविषयी घटनात्मक तरतूद असलेला भारत हा जगातील एकमेव देश आहे. ग्रामीण आणि शहरी भागांसाठी असलेल्या या संस्था म्हणजे लोकशाहीची पाठशाळा असून सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या निवडणुकांमध्ये यशस्वी होण्यासाठी 'साम-दाम-दंड-भेद' ही तंत्रे वापरली जातात; परंतु याहीपेक्षा पुढे जाऊन एखाद्या कार्यकर्त्याचे जनतेशी असलेले निःस्वार्थ नाते त्याला सहज विजय मिळवून देते. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना उभारताना '८०% समाजकारण आणि २०% राजकारण' हा फॉर्म्युला दिला. या सूत्राचा वापर करून अनेक कार्यकर्त्यांनी समाजोपयोगी कामे केली. त्यांच्या शाखांमधून सामान्यांच्या अडचणी दूर केल्या जात असत. साडेचार वर्षे समाजकारण आणि फक्त दोन-तीन महिने निवडणुकीपुरते राजकारण करणारा हा पक्ष अल्पावधीत महाराष्ट्रातील प्रमुख पक्ष बनला आणि १९९५ मध्ये सत्तेवरही आला.

आज, मात्र, हा फॉर्म्युला अनेक पक्ष विसरले आहेत. एकमेकांवर झहरी टीका करणे, द्वेषमूलक वक्तव्ये करणे—यातून केवळ न्यूज चॅनेल्सचा टीआरपी वाढतो. काम कमी आणि बोलणं जास्त, 'शिळ्या कढीला ऊत' आणण्यासारखे प्रकार स्थानिक पातळीपासून ते राज्यपातळीपर्यंत राजकारणात दिसून येतात. लोकशाहीमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, आपले मत आणि विचार मांडण्याचे व प्रचार करण्याचेही स्वातंत्र्य आहे. वाद-विवादातून विचारांची लढाई लढण्याचेही स्वातंत्र्य आहे. अमेरिकेत राष्ट्रपती पदाचे उमेदवार प्रसारमाध्यमांसमोर थेट वादविवाद करतात. त्यांच्या बोलण्यातून त्यांचा आत्मविश्वास, कामाची तळमळ आणि विचारांचा गाभा दिसून येतो. सुज्ञ नागरिक ज्याचे व्यक्तिमत्त्व जास्त प्रभावी वाटते त्यालाच निवडतात.परंतु केवळ विचारांची लढाई पुरेशी नसते. धोरणात्मक निर्णय घेण्याची क्षमता आणि ती धोरणे राबवण्याची कुवत ज्याच्यात असते तोच खऱ्या अर्थाने लोकांच्या पसंतीस पडतो. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून राजकीय प्रवासाची सुरुवात करून मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचलेल्या स्वर्गीय विलासराव देशमुख आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचे अभ्यासपूर्ण चिंतन कार्यकर्त्यांनी करायला हवे. 'खणखणीत नाणे कुठेही चालते' या म्हणीप्रमाणे आपले काम हेच आपली खरी ओळख असते.

आज एखादा कार्यकर्ता कोणत्याही पक्षापुढे तिकीट मागण्यासाठी जातो, तेव्हा दोन प्रश्न विचारले जातात—या निवडणुकीत किती खर्च करण्याची ऐपत आहे? तुझ्या मागे तुझा समाज किती आहे? जो कार्यकर्ता या दोन प्रश्नांच्या चौकटीपलीकडे जाऊन काम करतो, तोच विलासराव देशमुख आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा लांबचा राजकीय पल्ला गाठू शकतो.

प्रत्येक कार्यकर्त्याने स्वतःला काही प्रश्न विचारायला हवेत—माझे व्यक्तिमत्त्व खरोखरच जनसेवेस पात्र आहे का? संयम आणि सहनशीलता माझ्यात किती आहे? सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन काम करण्याची क्षमता माझ्यात आहे का? या सर्वांचा विचार करूनच कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या राजकारणात उतरावे. कार्यकर्ता ते नेता होण्याच्या या निवडणुकातून महाराष्ट्राला पुरोगामी, विकासाभिमुख, दूरदृष्टी असणारे आणि सहिष्णू वृत्तीचे नेतृत्व मिळेल हीच अपेक्षा...



**किशोर जाधव, सोलापूर**
मो. नं. ९९२२८८२५४१

## प्रबोधन

# वांझोट्या प्रार्थना । शोभती मूर्खांना

भूमिपुत्र गोतम बुद्ध ईश्वर मानत होते काय? नाही. तीर्थंकर महावीर ईश्वर मानत होते काय? नाही. मात्र हे दोन्ही महापुरुष मानसिक शिस्त, नियमितपणा आणि चिंतन-वृद्धी यासाठी प्रार्थना आवश्यक मानत होते. सामुदायिक प्रार्थना ही त्यांना स्वमतप्रचार, शिष्य अथवा अनुयायी यांच्या शंका दूर करण्यासाठी चर्चा करणे, सर्वांनी ठराविक वेळी एकत्र येण्याचं वळण लागणं आणि त्यातून संघाचा विकास साधणे यासाठी आवश्यक वाटत होती. गोतम बुद्ध, महावीर आणि राष्ट्रपिता गांधी यांच्या प्रार्थना ह्या अशा समाज सुधारणे, भौतिक सुख, मनाचं व्यवस्थापन आणि समाधान या गोष्टींशी निगडित होत्या. महात्माजी म्हणत असत, 'The prayer of the pure heart never goes unanswered' याचा वेगळाच अर्थ काढून अध्यात्मवादी महात्मा गांधींवर घोर अन्याय करून त्यांना पूर्ण ईश्वरवादी ठरवण्याचा सतत प्रयत्न करतात. पण बुद्ध, महावीर, गांधीजी हे ईश्वरवादी, ईश्वरनिष्ठ, ईश्वरोपासक किंवा ईश्वरावलंबी नव्हते, हे त्यांना मानणाऱ्यांपैकी कितीजणांना मान्य आहे?

आज गोतम बुद्धांची विहारं-मंदिरं आहेत, महावीरांची देरासर - मंदिरं आहेत. भारतात गांधीजींचंही मंदिर नावापुरते का असेना, पण आहे. भविष्यकाळी गांधीमंदिरांची संख्या वाढेल. तिथे काकड आरतीपासून शेजारतीपर्यंत सारे पूजाअर्चा- विधी पार पडू लागतील. तीर्थक्षेत्र म्हणून मंदिराचा गाव शासन-अनुदानास पात्र होईल. भाविकांची संख्या वाढल्यावर भट पुजारी येतील आणि दहा- वीस भट कुटुंबांची सूर्य-चंद्र असेपर्यंत रोजीरोटीची ददात मिटून चंगळ होईल. आपल्या गचाळ समाजजीवनाचा हा इतिहास डोळे मिटून लिहावा आणि डोळे मिटून वाचावा, नव्हे पारायण करावा इतका अंगवळणी पडलेला आहे. गलिच्छ आहे.

असो. साने गुरुजींनी महात्मा गांधींची एक आठवण लिहिली आहे. घटना १९३३- ३४ची आहे. अस्पृश्यता निवारणासाठी महात्माजींनी आधी उपवास केला आणि त्यानंतर भारतभर दौरा काढला. अस्पृश्यता दूर करा, मंदिरं-घरेदारं मोकळी करा, असं हा महापुरुष सांगत होता. अन्यायी धमार्ला निर्मळ रूप देत होता. दौरा काढता काढता ते जगन्नाथपुरीत आले. महात्माजींबरोबर कस्तुरबा होत्या. सायंप्रार्थनेनंतर महात्माजी विसावा घेत होते. कस्तुरबांना जगन्नाथाचं दर्शन घेण्याची इच्छा झाली. महादेवभाईंना बरोबर घेऊन त्या मंदिरात गेल्या. दर्शन घेऊन त्या थोड्या वेळाने परतल्या, पण त्या मंदिरास गेल्याचं ऐकून महात्माजी बेचैन झाले. त्यांना काही सुचेना. हृदय धडधडू लागलं. ते अति-अस्वस्थ झाले. कस्तुरबा आल्यावर महात्माजी म्हणाले, 'तुम्ही देवळात कसे गेलात ? मी स्वतःला हरिजन अस्पृश्य समजत असतो. तिथे हरिजनांना मज्जाव तिथं आपण कसं जायचं ? मी इतरांना क्षमा केली असती. तुम्ही माझ्याशी एकरूप झालेली माणसं, तुम्ही गेलात म्हणजे मंदिरात मीच गेल्यासारखं झालं. छेः मी हे कसं सहन करू ? माझी वेदना कुणास सांगू?' महात्माजींना बोलवेना. छातीचे ठोके वेगाने पडत होते. त्यांचे प्राण कंठाशी आले. डॉक्टरांची धावपळ झाली. कस्तुरबा प्रार्थना करीत बसल्या. हळूहळू महात्माजी शांत झाले. अनर्थ टळला. '

साने गुरुजी हे गांधीवादी, गांधीभक्त होते. त्यांनी निरीश्वरवादी महात्माजींचं जे चित्र रेखाटलं ते कोटी कोटी रुपयांना विकल्या जाणाऱ्या चित्रांहून मौल्यवानही आहे आणि धर्मवाद्यांच्या गाढवगोंधळात हरवून जाऊन ते दुर्मिळही झालं आहे. शहाण्या माणसाने म्हणूनच ते जपलं पाहिजे.

डॉ.ॲलेक्सीस कॅरेल हे नोबेल पुरस्कार विजेते जीवशास्त्रज्ञ 'Prayer generates power' असे म्हणाले असले तरी त्यांच्या विचारांचा भौतिक अर्थ काढणारेच शहाणे असतात, हे आपापल्या धर्मपंथांना समृद्ध करून गेलेल्या गोतम बुद्ध, महावीर आणि महात्मा गांधी या निरीश्वरवाद्यांच्या उदाहरणावरून का कळू नये? म्हणून लक्षात घ्या-

प्रार्थनेने साध्य । काही होत नाही
काम मात्र राही । गरिबाचे ॥ १
सर्व सुखी व्हावे । रोगी बरे व्हावे
हे कसे घडावे । प्रार्थनेने ? ॥२
वांझोट्या प्रार्थना। शोभती मूर्खांना
काय कार्याविना। मिळे फळ ॥३
प्रार्थनेची शिस्त। गांधींनी पाळली
उपक्रमा आली। गोड फळे ॥४
कामाचे डोंगर । आधी उपसावे
क्षणैक बसावे । प्रार्थनेस ॥५
प्रार्थनेची शक्ती । कळे शहाण्याला
साध्य अजागळा । कशी व्हावी? ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# अकलूज मध्ये घड्याळाने प्रचाराची दाहकता वाढवली

## उर्वशीराजे धवलसिंह मोहिते पाटील निवडणुकीच्या रणांगणात

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मुळे (अजित पवार गट) प्रचाराची दाहकता वाढली असून, डॉ.धवलसिंह प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या पत्नी सौ. उर्वशीराजे धवलसिंह मोहिते पाटील अकलूज नगरपरिषदेच्या निवडणूक रणांगणात उतरल्यामुळे अखंड राज्याचे लक्ष अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीकडे लागले आहे.

अकलूज मधुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे नेतृत्व डॉ. धवलसिंह मोहिते पाटील हे करीत आहेत.त्यांनी अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षासह सर्वच प्रभागातून उमेदवार दिले आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या राजकीय सारीपाटावर ज्या कर्तुत्वांन नेतृत्वाने जनविकासाचा आणि जनसेवेचा उत्तुंग डाव जिंकून, स्वतःच्या कर्तुत्वान कायार्चा प्रताप अखंड महाराष्ट्राला दाखवून दिला होता ते स्व.प्रतापसिंह शंकरराव मोहिते पाटील यांनी केलेल्या कार्याला या निवडणुकीच्या प्रचार सभेत नव्याने



उजाळा मिळत आहे.

स्व. प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या कर्तुत्वान कार्याचा धागा पकडत, जनसेवेचा आलेख उच्चविद्या विभूषित डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांनी उंचावत ठेवला आहे.ही त्यांची जमेची बाजू ठरू लागली आहे.

अकलूज नगरपरिषदेची ही निवडणूक काही राजकीय पक्षांच्या प्रतिष्ठेची बनली आहे. तर काही पक्षांच्या अस्तित्वाची आणि अस्मितेची बनली आहे. काहींसाठी राजकीय भविष्य घडवण्यासाठी बनली आहे, परंतु डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांच्यासाठी ही निवडणूक, फक्त जनसेवा आणि जनतेच्या विकासासाठी आहे असे दिसून येत आहे.कारण डॉ.धवलसिंह मोहिते पाटील हे अकलूज येथील शिवापुर पेठेत,प्रचार सभेत म्हणाले होते की,अकलूजचा विकास मागे पडला आहे.सोन्यासारखे गाव अनेक प्रश्नांनी ग्रासले आहे.यामुळे तुतारी आणि भाजपला मत मागण्याचा अधिकार नाही.त्यांच्या या भाषणाने माणसांची मने जिंकली असले तरी, प्रत्यक्षात ही तिरंगी लढत आहे आणि सर्वच पक्षांच्या प्रचाराची धगही वाढली आहे.या धगीत कितपत कमळ फुलेल? तुतारीचा गोडवा कितपत मंत्रमुग्ध करेल? तर पुन्हा घड्याळाचे आगमन कितपत करामत करेल? हे आता अकलूजच्या जनतेवर अवलंबून आहे.

# जिजाऊ ज्ञान मंदिरात महात्मा फुले स्मृतिदिन 'शिक्षक दिन' म्हणून उत्साहात साजरा



**कोंडी (कटूसत्य वृत्त):-** जिजाऊ ज्ञान मंदिर येथे क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षणसम्राट फुलेंच्या कायार्चा गौरव करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे हा उपक्रम घेण्यात येतो. या कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ यांनी विशेष उपस्थिती दर्शवून सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश नीळ यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. दहावीच्या श्रेय सुतार हिने प्रास्ताविक करताना महात्मा फुले यांनी समाजातील वंचितांसाठी केलेल्या शैक्षणिक क्रांतीची आठवण करून दिली.

यानंतर बालवर्ग, माध्यमिक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या कार्यावर, शिक्षणाच्या महत्वावर आणि शिक्षकांच्या भूमिकेवर प्रभावी भाषणे केली. विद्यार्थ्यांच्या सहभागाने सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. कार्यक्रमात विविध सांस्कृतिक सादरीकरणांनीही रंगत आणली.

आपल्या भाषणात संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ म्हणाले, 'ज्यांनी आयुष्यभर एकही शाळा उघडली नाही, त्यांच्या नावाने शिक्षक दिन साजरा करण्याऐवजी ज्यांनी संपूर्ण जीवन शिक्षणप्रसारासाठी अर्पण केले त्या महान महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनाचाच खरा शिक्षक दिन मानला पाहिजे.' त्यांचे हे मत विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त टाळ्यांनी दाद देत स्वीकारले.

कार्यक्रमाचा विशेष आकर्षणाचा भाग म्हणजे 'विद्यार्थी शिक्षक' उपक्रम. दहावी, नववी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दिवसभर विविध वर्गांमध्ये जाऊन अध्यापनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. गणित, इंग्लिश, मराठी, हिंदी यांसारख्या विषयांचे धडे विद्यार्थ्यांनी आपल्या वेगळ्या पद्धतीने शिकवण्याचा प्रयत्न केला. शिक्षकाची भूमिका निभावताना विद्यार्थ्यांना वर्गशिस्त, शिकवण्याची पद्धत, तसेच अभ्यास न करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधावा याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

समारोप सत्रात दिवसभर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या 'विद्यार्थी-शिक्षकां'चे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती गुंड हिने तर आभार प्रदर्शन नियती वाकचौरे हिने केले.

या कार्यक्रमासाठी प्राचार्या सुषमा निळ, मुख्याध्यापिका अर्चना आवरादे, शिक्षक वैभव मसलकर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

महात्मा फुले यांच्या प्रेरणादायी कायार्ची शिकवण देत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# नेताजी प्रशालेत संविधान दिन व शहीद दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत संविधान दिन व शहीद दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, ज्येष्ठ शिक्षक राजकुमार मरगुरे, संगप्पा दसगोंडे, विजयालक्ष्मी माळवदकर, संगप्पा दसगोंडे यांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या अशोक कामटे, हेमंत करकरे व शहीद विजय साळसकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.मनिषा चिरमाडे, भूमी मासपत्री, मुजरीन मुल्ला, दर्पण राठोड, सिद्धार्थ पोषम, समृद्धी पेडसिंगे, श्रुती मोरे, आरोही काशीद, अखिल जरबंडी, सार्थक मादगुंडी, आदित्य केशेट्टी, उमा बिटला, सारिका मोतकुर, कावेरी पगड्याल, अक्षया सुंकनपल्ली आदी विद्यार्थ्यांनी संविधान व शहिद दिनाविषयी माहिती सांगितले. संगप्पा दसगोंडे, गणपती पाटील व इरण्णा कलशेट्टी यांच्याकडून प्रत्येकी १०१ रुपये बक्षीस देण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानंद पुजारी यांनी केले तर सिद्धाराम बिराजदार यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# दि. 02 व 03 डिसेंबर रोजी मतदान व मोजणी कारणास्तव आठवडेबाजार बंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी राज्यातील 246 नगरपरिषदा व 42 नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम 2025 दिनांक-04 नोव्हेंबर 2025 रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे.

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्राप्त निदेर्शानुसार मतदाना दिवशी मतदान केंद्राच्या परिसरात कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करुन मतदान प्रक्रिया निर्भयव व निष्पक्ष वातावरणात पार पाडणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

सार्वत्रिक नगरपरिषद / नगरपंचायत निवडणूक 2025 च्या जाहीर कार्यक्रमानुसार सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील मतदान दिनांक-02 डिसेंबर 2025 व मतमोजनी दिनांक-03 डिसेबर 2025 रोजी असल्याचे जाहीर करण्यात आले आहे व यास अनुसरुन सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मतदाना दिवशी वार मंगळवार दिनांक-02 डिसेंबर 2025 व मतमोजनी दिवशी वार बुधवार दिनांक-03 डिसेबर 2025 खालील तक्त्यात नमुद नगरपरिषद / नगरपंचायत हद्दीतील आठवडा बाजार भरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्या नुसार जिल्हादंडाधिकारी, कुमार आशीर्वाद, सोलापूर,यांच्या अधिकारान्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम, कलम 37(3) व दि. मार्केट ॲण्ड फेअर ॲक्ट 1862 मधील कलम 5 (ग) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन, सार्वत्रिक नगरपरिषद / नगरपंचायत निवडणूक- 2025 च्या अनुषंगाने मतदान केंद्राच्या परिसरात सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी खालील नगरपरिषद / नगरपंचायत हद्दीतील आठवडा बाजार दि.02 व 03 डिसेंबर 2025 रोजी भरविण्यास मनाई करण्याचा आदेश देण्यात आले आहेत.

पंढरपूर नगरपरिषद- मतमोजणी चे ठिकाण - शासकीय धान्य गोडाऊन पंढरपूर. - वार मंगळवार

दुधनी नगरपरिषद - मतमोजणीचे ठिकाण - दुधनी नगरपरिषद सभागृह- वार मंगळवार

# नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी १ डिसेंबरला रात्री १० पर्यंत प्रचाराची मुदत

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत असून, त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत 'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५' मधील तरतुदीनुसार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० पर्यंत असेल. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांस संबंधित कायद्यांमधील तरतुदींनुसार घेतल्या जातात. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसंदर्भातील कायद्यात जाहीर प्रचाराचा कालावधी




निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार मतदान सुरू होण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजल्यापासून प्रचार पूर्णपणे बंद होईल. त्यानंतर प्रचारसभा, मोर्चे आणि ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. त्याचबरोबर निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारण करता येणार नाही.

## वात्रटिका

### भाऊबंदकी

कधी घडते असे तर
कधी घडते तसे...
नाटक अंगलट येते नि
आपलेच होते हसे...
प्रखर विरोध दाखवून
नाटक वटवले जाते...
आतून जुळले असते वरून
फाटलेले दाखवले जाते...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# भाजपा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शिरसट यांना भोसले कुटुंबाचे मोठे पाठबळ

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर नगरपालिका निवडणूक सुरू असून राजकीय घडामोडींना वेग आला आहे. जातीच्या नावावर राजकारण करणाऱ्या नेत्यांकडून सदरच्या निवडणुकीकडे ओबीसी विरुद्ध ओपन असा गवगवा केला जात आहे. मात्र पंढरपुर शहरातील राजकारणातील मातब्बर घराणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भोसले कुटुंबातील काही सदस्यांनी भाजपा उमेदवार शामलताई शिरसट यांना पाठिंबा दिल्याने जातीच्या नावावर राजकारण करणाऱ्या नेत्यांना चांगली चपराक बसली आहे.

पंढरपूरच्या राजकारणात माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी जातीपातीचे राजकारण न करता सर्व जाती समूहाला प्रतिनिधित्व देण्याचे काम केले आहे.

या निवडणुकीतही जातीच्या नाहीतर कामाच्या जोरावर सर्वसामान्य कुटुंबातील शामलताई शिरसट यांना भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यात आली आहे.



तर दुसरीकडे काँग्रेस प्रणित तीर्थक्षेत्र विकास आघाडीतून पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांच्या पत्नी प्रणिता भालके यांच्या माध्यमातून नेत्यांच्या घरातीलच उमेदवार लादण्यात आल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांमधून नाराजीचा सूर उमटू लागला आहे.

लोकसभा, विधानसभेनंतर राज्यभरात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे कार्यकर्त्यांसाठीच्या निवडणूका म्हणून पाहिले जाते मात्र पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत विधानसभेसाठी उभारणाऱ्या नेत्यांनीच आपल्या घरातील उमेदवार दिल्याने त्यांच्याच गटातील कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर पहावयास मिळत आहे. याबाबत काहींनी तर उमेदवारी अर्ज दाखल करून विरोध दर्शवला होता. मात्र त्यांची मुस्कटदाबी करण्यात आली. याचबरोबर सर्व काही घरातीलच नगराध्यक्षपदाच्या उमेदवारासाठी असे धोरण असणाऱ्या नेत्याबाबत त्यांच्याच सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांमध्ये नाराजी दिसून येत आहे. यामुळे जसे जसे निवडणुकीचे मतदान जवळ येईल तसतसे निवडणुकीचे चित्र बदलताना दिसत आहे.

### शिरसट यांच्यासाठी भोसले कुटुंब मैदानात

पंढरपूर शहराच्या राजकारणातील मातब्बर घराणे म्हणून ओळखले जाणारे भोसले कुटुंबातील सदस्य भाजपा उमेदवार शामलताई शिरसट यांच्या विजयासाठी मैदान उतरले असून यामध्ये दिपक उर्फ गणपत वसंतराव भोसले, मूकुंद वसंतराव भोसले, हेमंत वसंतराव भोसले, औंदुबर भोसले, शिवतेज भोसले, जयवंत भोसले, डॉ. सागर भोसले, विक्रम भोसले, प्रसाद भोसले, विनायक भोसले, रणविर भोसले, कांतीलाल सूपेकर यांनी प्रचाराची धुरा हाती घेतली आहे.

# मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे मतदानासाठी ग्राह्य - डॉ. सीमा होळकर

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** मतदानासाठी निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्र (EPIC) व्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून, त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येईल, अशी माहिती, निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सीमा होळकर यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदान दि. ०२ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. ज्यांच्याकडे मतदार ओळखपत्र आहे, असे मतदार मतदान केंद्रावर आपली ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र सादर करतील. मतदार ओळखपत्र नसणाऱ्या मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. भारतीय पारपत्र (पासपोर्ट), आधार ओळखपत्र, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), आयकर विभागाकडील पॅन कार्ड, केंद्र शासन, राज्य शासन, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहीत दिलेली ओळखपत्रे, राष्ट्रीयकृत बँक अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक, राष्ट्रीयकृत बँक अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाची फोटो असलेले दस्तावेज अथवा पासबुक, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिकाचे फोटो असलेले ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड असे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.

मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार ओळखपत्र किंवा वरील १२ पैकी कोणताही एक मुळ पुरावा सोबत घेवून जाणे आवश्यक आहे. तसेच मतदान कक्षात मोबाईल नेण्यास बंदी असेल.

# सोलापूर बसस्थानावरील अस्वच्छ शौचालयाबद्दल आगार व्यवस्थापक निलंबित!



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 28 नोव्हेंबर रोजी (शुक्रवार) परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सोलापूर मध्यवर्ती बसस्थानकाला पुन्हा एकदा भेट दिली. या भेटी दरम्यान शौचालय, पाणपोई सारख्या सर्वसामान्य प्रवासी व नागरिकांनी पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधा कडे अक्षम्य दुर्लक्ष केल्या प्रकरणी सोलापूर आगाराचे 'आगार व्यवस्थापक' यांना निलंबित करण्याचे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

आज दुपारी मध्यवर्ती बसस्थानकावरील शौचालयाची पाहणी केली असता, तेथील अस्वच्छता आणि दुर्गंधीयुक्त परिसर पाहून संबंधित अधिकाऱ्यांना चांगले धारेवर धरले. शौचालयाचे व्यवस्थापन बघणाऱ्या खाजगी संस्थेकडून शौचालयाची डागडुजी करण्यात आली नव्हती, अनेक ठिकाणी फरशा उखडल्या होत्या. तसेच स्वच्छता देखील ठेवण्यात आली नव्हती. तसेच जवळच असलेल्या पाणपोई परिसरात देखील अत्यंत अस्वच्छता असल्याचे त्यांना आढळून आले. पाणपोईच्या 5 नळा पैकी केवळ एकच नळ सुरू होता. या बाबतीत उपस्थित आगार व्यवस्थापक व वाहतूक नियंत्रक यांना समाधान कारक उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे संबंधित आगार व्यवस्थापक यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांना निलंबित करण्याचे निर्देश मंत्री महोदयांनी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना तात्काळ दिले.

विशेष म्हणजे मागील आठवड्यात उपरोक्त त्रुटी दूर करून प्रवाशांना चांगल्या सुविधा निर्माण करून देण्याचे निर्देश आपल्या आकस्मिक पाहणी दौऱ्यात मंत्री सरनाईक यांनी संबंधितांना दिले होते. याबाबत पुढील दौऱ्याच्या वेळी पुनश्चः तपासणी करण्यात येणार असून त्यानंतर देखील प्रवासी सुविधा मध्ये हलगर्जीपणा आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या वर निलंबनाची कारवाई करण्यात येईल असा सज्जड दम देखील भरला होता. परंतु सोलापूर बस स्थानकावरील या गैरसोयीबद्दल कोणताही बदल स्थानिक प्रशासनाकडून करण्यात न आल्यामुळे अत्यंत नाईलाजाने संबंधित आगार व्यवस्थापकांना निलंबित करण्याचे निर्देश मंत्र्यांना द्यावे लागले आहेत. तथापि, राज्यातील एसटीच्या 251 आगार प्रमुखांनी या घटनेकडे अत्यंत गंभीरपणे पहावे आणि प्रवाशांच्या सोयी सुविधांच्या बाबतीमध्ये विशेषतः बसस्थानकावरील महिला प्रसाधनगृहाच्या बाबतीमध्ये कोणत्याही प्रकारची हलगर्जी यापुढे खपवून घेतली जाणार नाही. असे स्पष्ट निर्देश यावेळी मंत्री सरनाईक यांनी दिली आहेत.

# ग्रंथपालन प्रशिक्षण प्रवेशासाठी आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने सर्व समावेशक, शाळा, कॉलेज, आश्रमशाळा, सार्वजनिक ग्रंथालय, रेल्वे महामंडळ, कोर्ट, कृषी विभाग, कृषी विद्यापीठ, खाजगी कंपन्या इत्यादी विभागात ग्रंथपाल, ग्रंथालय सहाय्यक, निर्गम सहाय्यक, ग्रंथालय परिचर आणि विशेष करून आरोग्य विभागात अभिलेखापाल या पदाकरीता रोजगाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे नवीन सुधारित सहा महिन्याचे ग्रंथपालन प्रशिक्षणाची निर्मिती केली आहे. सदर प्रशिक्षण हे जानेवारी 2026 ते जून 2026 या कालावधीमध्ये होणार असून या प्रशिक्षणाच्या प्रवेशा करिता इयत्ता बारावी कोणत्याही शाखेतून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रवेशा करिता वयाची अट नाही. या प्रशिक्षणाचे माध्यम मराठी राहणार असून प्रशिक्षणाचे स्थळ : सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सोलापूर, हुतात्मा स्मारक मार्कंडेय उद्यान, अशोक चौक, पोलीस चौकी समोर, सोलापूर कार्यालय राहणार असून प्रशिक्षणाचे वर्ग दर शनिवारी आणि रविवारी या दोनच दिवशी राहणार आहेत. प्रशिक्षणाची प्रवेश प्रक्रिया दररोज सकाळी 10 ते दुपारी 5 या वेळात सुरू असून प्रवेशाचा अंतिम दिनांक 25 डिसेंबर 2025 पर्यंत असून प्रवेशा करिता कोणत्याही मूळ (ओरिजनल) शैक्षणिक प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. करिता जिल्ह्यातील सर्व ग्रंथप्रेमी नागरिक त्याचप्रमाणे शाळा, कॉलेजचे विद्यार्थी, कर्मचारी, स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. हा अभ्यासक्रम डी. एड समकक्ष आहे. सदर प्रशिक्षणा करिता प्रवेश घेण्याची अंतिम तारीख 25 डिसेंबर 2025 आहे. प्रवेशाकरिता इयत्ता बारावीची गुणपत्रिका झेरॉक्स, शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स, जातीच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स आणि आधार कार्डची झेरॉक्स त्याचप्रमाणे चार पासपोर्ट साईज फोटो इत्यादी आवश्यक राहणार आहेत प्रशिक्षणाच्या प्रवेशा करिता अधिक माहितीसाठी 9404666488 / 7350922276 या भ्रमणध्वनीवर संपर्क करू शकता, असे आवाहन सोलापूर केंद्राचे वर्गव्यवस्थापक ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनी केले आहे.

**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
**पत्ता:** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# सीना नदीवरील तिऱ्हे-शिंगोली तरटगाव पूल अत्यंत धोकादायक, खा. शिंदे यांची पाहणी

**उत्तर सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे आणि मोहोळ तालुक्यातील शिंगोली-तरटगाव यांना जोडणारा सीना नदीवरील पूरग्रस्त जुना पूल सध्या जीवघेणा ठरत असून गेल्या काही महिन्यांपासून तो पूर्णपणे नादुरुस्त आहे. पूलावरील साईड रोलिंग व संरक्षक पाईप तुटून पडले असून काही भाग नदीच्या पाण्यात वाहून गेले आहेत. पुलावरील खोल खड्डयांमुळे सतत अपघात घडत असून वाहतूक धोकादायक झाली आहे.

गेल्या पंधरा दिवसांत या पुलावर तीन मोठे अपघात झाले आहेत. एका व्यक्तीचा पाय फ्रॅक्चर झाला, दुसऱ्या अपघातात प्रवासी टमटम पूल ओलांडताना पाण्यात कोसळला आणि चालकाचा जीव थोडक्यात वाचला. आज पुन्हा मोटारसायकलस्वार गंभीर जखमी होऊन पाय बंदी झाला आहे.

या वाढत्या अपघातांबाबत स्थानिक नागरिकांनी खासदार प्रणिती शिंदे यांना कळविल्यानंतर त्यांनी आज प्रत्यक्ष घटनास्थळी येऊन पुलाची पाहणी करत



नागरिकांशी संवाद साधला.

नागरिकांनी सांगितले की, गेल्या दोन-तीन महिन्यांपासून पूल अत्यंत जर्जर अवस्थेत असून आठ ते दहा गावांच्या नागरिकांची ये-जा पूर्णपणे या पुलावरच अवलंबून आहे. रस्ता धोकादायक झाल्याने एसटी वाहतूक बंद झाली असून शाळकरी विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नॅशनल हायवे विभाग यांच्या जबाबदारीच्या वादात दुरुस्ती रखडल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

खासदार प्रणिती शिंदे यांनी या परिस्थितीची गंभीर दखल घेत तातडीने मा. जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून पुलाच्या दुरुस्तीबाबत त्वरित कारवाईची मागणी केली.

यावर तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत जिल्हाधिकाऱ्यांनी नॅशनल हायवे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक घेऊन पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश दिले.

या पाहणीवेळी उत्तर सोलापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भारत जाधव, मोहोळ तालुका काँग्रेस अध्यक्ष सुलेमान तांबोळी, राजेश पवार, सोमनाथ दावणे, कुंदन दावणे, राजू मोटे, रावसाहेब गायकवाड, महेश गायकवाड, बबलू रासेराव, राहुल भोई, कस्तुरे, चंद्रभान गायकवाड आदी नागरिक उपस्थित होते.

# 'बाळे ते जुळे' पर्यंत राष्ट्रवादीचे नगरसेवक मनपात जातील - अण्णा बनसोडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गोविंदश्री मंगल कार्यालयातील प्रभाग २४ आणि २६ च्या राष्ट्रवादीच्या बैठक वजा भेटीत आगामी सोलापूर महानगरपालिका जिंकण्याचा निर्धार राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांच्या साक्षीने पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केला.राष्ट्रवादी सोशल मीडियाचे प्रमुख प्रमोद भोसले यांनी या बैठक - भेटीचे आयोजन केले होते. सोलापूर शहरात गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी पक्षाचे काम मोठ्या जोमाने सुरू आहे सातत्याने अजित दादांच्या पक्षाकडे येण्याचा ओढा अनेकांचा वाढला आहे.जुळे सोलापूर भागामध्ये यंदा कोणत्याही परिस्थितीत अजितदादा पवार



यांच्या राष्ट्रवादीचे जास्तीत जास्त नगरसेवक सोलापूर महानगरपालिकेत जातील, असा विश्वास प्रमोद भोसले यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. सर्वांच्यावतीने अण्णा बनसोडे यांचा विशेष सत्कारही करण्यात आला. अण्णा बनसोडे यांनीही या भेटीत उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांना जोमाने कामाला लागण्याच्या सूचना केल्या.केवळ जुळे सोलापूर नव्हे तर "बाळे ते जुळे "इथपर्यंत अजित दादा पवार राष्ट्रवादीचे नगरसेवक महानगरपालिकेत गेले पाहिजेत, असे अण्णा बनसोडे यावेळी बोलताना म्हणाले.

यावेळी राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान, महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर, महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम, जेष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, विद्यार्थी अध्यक्ष अनिकेत व्हसुरे जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले माजी नगरसेविका नूतन गायकवाड, प्रियांका पवार, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी वाहतूक सेल विभाग अध्यक्ष इरफान शेख मध्य विधानसभा अध्यक्ष अल्मेहराज आबादीराजे उपस्थित होते.

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

**निरामय पॅरालिसिस सेंटर**

निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अ‍ॅण्ड फिजिओथेरपी सेंटर

ISO 9001:2015

NGO DARPAN

खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये

कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार




नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था

**मोबाईल नं. 9503310568**

पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण
४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे
८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी
१०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा **
१४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत)
१९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे
२५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी
२७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव
३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया
३२) किमानच्या विरूध्दार्थी
३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको
४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट
४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष
४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच
५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 113

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | 8 | 4 | 1 | | | | 9 |
| 5 | | 1 | | 2 | | 4 | 7 | |
| | 2 | 9 | | 6 | | | | |
| | 3 | | | | 7 | 6 | 9 | 4 |
| | 4 | 5 | 3 | | | 8 | 1 | |
| 1 | | | | | | 3 | | |
| 9 | | 4 | 6 | 7 | 2 | 1 | 3 | |
| 6 | | | | | | 7 | | 8 |
| | | | 8 | 3 | 1 | | | |

# प्रभाग १० मध्ये शिवसेना शिंदे पक्षाने प्रमुख मान्यवरांच्या बैठकानंतर देशमुख परिवाराचा डोअर टू डोअर प्रचारावर भर

## शिवसेना शिंदे पक्षाचे प्रभाग 10 मधील उमेदवार चैतन्य देशमुख यांच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठकांना प्रतिसाद

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहरातील प्रभाग क्रमांक दहा मधील शिवसेना शिंदे पक्षाची ताकद निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतिम टप्प्यात आता आणखी वाढताना दिसत आहे. ज्येष्ठ नेते पद्माकर अप्पा देशमुख यांनी त्यांचे सुपुत्र तथा युवा उद्योजक चैतन्य बापू देशमुख यांच्या उमेदवारीच्या रूपाने मोहोळ शहराच्या नगरपरिषद निवडणुकीतील राजकीय अस्तित्व कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. चैतन्य देशमुख यांनी शिवसेना शिंदे पक्षाकडून उमेदवारी खेचून घेतल्यापासून या प्रभागातील जनसंपर्कमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ तर केलीच मात्र प्रत्येक प्रभागातील प्रत्येक वाडी वस्त्यावर जाऊन तेथील रस्ते पाणी आरोग्य विषयक समस्या जाणून घेतल्या.



सर्वसामान्य नागरिक त्यांची विकासाबद्दलची तळमळ आणि राजकीय पदार्पण आणि केवळ सेवाभावी धोरणाने ठेवलेले पाऊल पाहून त्यांना धनुष्यबाण चिन्हावर विजयरुपी शुभेच्छा देताना दिसत आहेत. प्रभागातील काही प्रमाणात रखडलेले प्रश्न बारकाईने जाणून घेत त्याबाबत ठोस निर्णय घेऊन सर्वांना सत्तेच्या माध्यमातून विकासकामे खेचून आणून शब्द पूर्ण करण्याची हमी उमेदवार चैतन्य देशमुख यांनी दिली दिली.

प्रभागाचा शहरी भागाचा समावेश असलेल्या विद्यानगर, बागवान नगर, अहिल्यानगर गरड महाविद्यालय परिसर, गवळी प्लॉटिंग, सुभाष नगर, गणेश नगर, बरेनगर, तक्षशिला सोसायटी चंद्रलोक पार्क मंदाकिनी रेसिडेन्सी या परिसरातील नागरिकांशी थेट संपर्क साधत पद्माकर अप्पा देशमुख यांनी उमेदवार असलेले चैतन्य बापू देशमुख यांच्या समवेत प्रभाग बैठका जनसंवाद दौरा आणि कॉर्नर बैठकावर भर देत डोअर टू डोअर प्रचाराचाही प्रभावी अवलंब केला आहे. देशमुख परिवारातील युवा नेते प्रसाद देशमुख व प्रत्येक सदस्य प्रचारात सहभागी झाल्यामुळे या प्रचारातील शिवसेना शिंदे पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे.

# सुदाम तथा उत्तरेश्वर शिंगाडे यांच्या लोकप्रियतेची संपूर्ण शहरभर चर्चा

## मोहोळ शहरातील सर्वाधिक दाट लोकवस्तीच्या प्रभाग क्रमांक ९ मध्ये एक सर्वसामान्य युवक लढतोय विकासासाठीची एकाकी लढाई

## आलिशान बंगले अन भारी गाडीवाल्यांच्या विरोधात मोटार मोटरसायकलवाल्या सुदामची तुतारीद्वारे लढाई

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** नाव सुदाम तथा उत्तरेश्वर शिंगाडे एक सुशिक्षित नवयुवक. एका सर्वसामान्य आणि अतिशय हलाखीच्या कुटुंबात जन्मलेला एक अतिशय तल्लख मुलगा. गेल्या दहा वर्षापासून प्रभाग क्रमांक नऊ मधील प्रत्येक सर्वसामान्यांच्या संपर्कात राहून रस्ते, पाणी, आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठी धडपड करतो. सर्वांचा द्वेष आणि विरोधी सहन करतो मात्र सर्वांशी नम्रपणे वागतो आणि प्रत्येकाचे हृदय जिंकतो. याच सुदामने मोहोळ शहराच्या दक्षिण भागातील निवडणूक आगळावेगळ्या प्रचाराने गाजवली आहे. या प्रभागामध्ये धनशक्ती विरुद्ध जनशक्ती असा सामना रंगताना दिसत आहे. एकीकडे कोट्यावधी रुपयांची यंत्रणा मैदानात उतरवणारे दिग्गज उमेदवार आणि दुसरीकडे फायनान्सच्या हप्त्यावर मोटरसायकलवर विश्वासू मित्र दिलीप पवार यांच्यासह प्रभागात विकासासाठी धडपडणारा युवक.



सुदाम याने शरदचंद्र पवार पक्षाची उमेदवारी घेत तुतारी घेऊन प्रचारामध्ये रंगत आणलेली. या प्रभागात अनेक हाय प्रोफाईल, आलिशान लाइफस्टाईलचे जीवन जगणारे बडे उमेदवार सुदाम यांनी उघड्या डोळ्याने पाहत असताना स्वतःच्या डोळ्यासमोर मात्र पायी चालत जाणारा मतदार ठेवला आहे. दररोज कामाला जाणारा युवक, सर्वसामान्यांच्या घरी मोलमजुरी करणारी महिला भगिनी या प्रत्येकाच्या मनामनात भिनलेला हा युवक मतदानाच्या निमित्ताने प्रभागात वादळाला तोंड देत उभा आहे. तूतारी चिन्हाच्या माध्यमातून मतदान मागणाऱ्या सुदामची चर्चा केवळ प्रभाग क्रमांक नऊ मध्ये नाही तर संपूर्ण शहरात आहे. त्यामुळे सुदामचा प्रचार त्याची एकहाती रणनीती त्याची धडपड, त्याची विकासाबद्दलची तळमळ त्याला निश्चितपणे विजयी करेल असा ठाम विश्वास त्याचा सन्मित्र असलेले दिलीप पवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

हाच सुदाम नगरपरिषदेला निवेदन देतो, प्रसंगी उपोषण करतो तर कधी अधिकाऱ्यांना विनंती करून प्रभागात मुरूम टाकून रस्ते करून घेतो. गटारीने खोदलेले रस्ते, अस्ताव्यस्त पसरलेला चिखल या सर्व बाबी पाहून तो प्रशासनाला सदरचे खड्डे काँक्रिटीकरणाने डांबरीकरणाने बुजवण्याची विनंती करतो. नगर परिषदेची निवडणूक लागल्यानंतर मोठ्या पक्षाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी धडपड करतो. मात्र मोहोळ शहराच्या अंतर्गत हेव्या-दाव्याच्या आणि भांडवलदारांच्या ताब्यातील बंगला गाडी पाहून उमेदवारी देणाऱ्या सर्वपक्षीय राजकारणात त्याला दिग्गज पक्षाची उमेदवारी मिळू शकली नाही. कारण त्याच्यामागे लोक आहेत त्याला चांगला जनाधार आहे आता निवडून आलेला सुदाम नंतर आपल्या ऐकण्यात राहणार नाही या भावनेतून त्याचे खच्चीकरण करण्याचा झालेला प्रयत्नच त्याच्या जिद्दीला उमेद देतो.

# मोहोळ विकासासाठी सर्वसमावेशक व्हिजन जाहीर; गृहनिर्माण, रस्ते, व्यापारी संकुल, क्रीडा व सुरक्षिततेचे महत्त्वाकांक्षी आराखडे

## सोमेश क्षीरसागर यांची घोषणा



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोठ्या स्वरूपाची योजना आज जाहीर करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ स्मारक उभारणी समिती सदस्य तसेच भाजपचे माजी तालुकाध्यक्ष सोमेश क्षीरसागर यांनी आगामी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपले व्हिजन डॉक्युमेंट सादर केले. गृहनिर्माण, पाणीपुरवठा, रस्ते, व्यापार, क्रीडा, आरोग्य आणि सुरक्षिततेपर्यंत बहुआयामी विकासाचा आराखडा त्यांनी मांडला.

रमाई आवास योजनेंतर्गत अर्ज केलेल्या सर्व गरजू लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यासाठी पुढाकार. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत भूमिहीन कुटुंबांसाठी शहरात ३०० परवडणारी घरे उभारण्याचे उद्दिष्ट. अंदाजे १८ कोटी निधी मिळवण्याचा प्रयत्न. पाणी व गटार योजनेंतर्गत सुरू असलेली शहर पाणीपुरवठा योजना आणि भुयारी गटार योजना लवकरात लवकर, निकृष्ट दर्जा न ठेवता पूर्ण करण्याचे आश्वासन. शहरातील प्रत्येक घरासमोर दररोज नियमित घंटागाडी सेवा. मोहोळ शहर स्वच्छ, नीटनेटके व सुंदर बनवण्यासाठी स्वतंत्र उपक्रम सुरू करण्याचा संकल्प. रस्ते विकास आणि दळणवळणाच्या सुविधा देवून शहराला नवी दिशा, मोहोळ शहर रस्ते विकास आराखडाच्या माध्यमातून एकूण २०० कोटींचा सर्वसमावेशक रस्ता आराखडा मंजूर करून त्यासाठी निधी मिळवण्याचे उद्दिष्ट.

शिवाजी महाराज चौक - मोहोळ रेल्वे स्टेशन रस्ता, नरखेड रोड - श्री नागनाथ मंदिर मार्ग, स्थिमोलंघन पांड - डोकेवस्ती (श्री समर्थ नगर मार्गे) - ढोक बाभुळगाव रस्ता हे महत्त्वाचे प्रस्ताव लवकरच मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

शिवाजी महाराज चौक व्यापारी संकुल (१०० गाळे):

शहराच्या मध्यभागी असलेल्या आरक्षित जागेत १२ कोटींचे संकुल उभारण्याचा प्रस्ताव. त्यामुळे व्यापाऱ्यांना आधुनिक जागा उपलब्ध होणार. व्यापारी संकुल उभा करून व्यवसायासाठी नवीन संधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच ढोक बाभुळगाव व्यापारी संकुलः ढोक बाभुळगाव रोडलगत आरक्षित भूखंडावर ५ कोटींचे नवे व्यापारी संकुल. तसेच नागरिकांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी श्रीराम नगर वसाहतीलगतच्या जागेत बहुउद्देशीय इंडोर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स. योगा प्रशिक्षण केंद्रासह नागरिकांच्या शारीरिक-मानसिक आरोग्यासाठी शहरात योगा केंद्र. शहरातील सर्व प्रमुख चौक, बाजारपेठ, वसाहतींमध्ये संपूर्ण CCTV नेटवर्क. शहरात आरक्षित जागेवर आकर्षक व आधुनिक सुसज्ज उद्यान उभारण्याची घोषणा. मोहोळच्या विकासासाठी या सर्व योजना प्रभावीपणे राबवण्याची पूर्ण जबाबदारी स्वीकारण्याची तयारी असल्याचे क्षीरसागर यांनी सांगितले.

शहराच्या पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य, क्रीडा आणि व्यापाराच्या प्रगतीसाठी सुस्पष्ट, अर्थपूर्ण आणि अमलात आणता येण्यासारखा ब्लूप्रिंट त्यांनी मांडला. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर क्षीरसागर यांचे हे व्हिजन मोहोळमध्ये चर्चेचा विषय ठरले आहे. शहरात विकासाचे नवे पर्व सुरू होण्याची आशा नागरिक व्यक्त करत आहेत.

# यंदा प्रभाग ५ मध्ये शिवसेना उबाठा पक्षाची मशाल विजयातून तळपणार

## शिवसेना उबाठा पक्षाचे उमेदवार गणेश क्षीरसागर आणि सपना क्षीरसागर यांच्या विजयासाठी पक्षश्रेष्ठींचे बेरजेचे राजकारण

## रखडलेला विकास आणि प्रभागवासीयांच्या सन्मानासाठी शिवसेनेच्या मशालीला विजयी करण्याचे गणेश क्षीरसागर यांचे प्रचारातून आवाहन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक ५ मधील विकासाचे रखडलेले प्रश्न, सर्वसामान्यांच्या मनामध्ये यापूर्वीच्या सत्ताधाऱ्याबद्दल असली नाराजी आणि शिवसेना उबाठा पक्षाला मानणारा मोठा वर्ग यांचा उत्तम समन्वय साधत या प्रभागातून विजय मिळवण्याचा निर्धार या प्रभागातील शिवसेना उबाठा पक्षाचे मशाल चिन्हाचे उमेदवार गणेश नवनाथ क्षीरसागर यांनी केला आहे.शिवसेना नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सपना दादाराव क्षीरसागर यांच्याही विजयासाठी संपूर्ण पक्षाची रणनीती प्रभागात राबवली असून या दोन्ही उमेदवारांचा विजय आता या ठिकाणाहून निश्चित मानला जात आहे. गणेश क्षीरसागर हे जुन्या काळापासून शिवसेनेमध्ये सक्रिय असलेले युवा नेते असून त्यांना मानणारा मोठा वर्ग या प्रभागात आहे. या प्रभागातील प्रत्येक सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाण्याची भूमिका असलेले गणेश यापूर्वीपासूनच लोकप्रिय युवा नेते म्हणून परिचित आहेत. त्याचा मोठा फायदा या निवडणुकीत त्यांना विजय मिळवण्यासाठी होताना दिसून येत आहे. गणेश क्षीरसागर यांच्या विजयासाठी ज्येष्ठ नेते दीपक गायकवाड, महिला आघाडीचे नेते सीमाताई पाटील त्याचबरोबर शिवसेनेचे या प्रभागातील लढवय्ये नेतेमंडळी सातत्याने प्रयत्नशील असून गणेश क्षीरसागर यांनी पदयात्रा आणि कॉर्नर बैठकावर मोठ्या प्रमाणात भर देत मतदारांशी संवाद वाढवला आहे.

मोहोळ शहराच्या चारही दिशेला शिवसेना उबाठा पक्षाला मानणारा मोठा वर्ग आहे. शिवसेना पक्षाने प्रभाग क्रमांक पाच मध्ये गणेश क्षीरसागर आणि सपना क्षीरसागर या दोन उमेदवारांना दोन्ही प्रभागातून संधी देत बेरजेचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रभागातील अन्य पक्षांची दबाव प्रचार यंत्रणा आणि मतदारांची दिशाभूल करण्याचा होणारा प्रयत्न या बाबींना छेद देत गणेश क्षीरसागर यांनी शिवसेनेच्या वरिष्ठ नेते मंडळींच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी प्रचार यंत्रणा सक्रिय ठेवली आहे. एक मनमिळाऊ आणि धडपडी व्यक्तिमत्व म्हणून परिचित असलेल्या गणेश क्षीरसागर यांना विजयी करण्यासाठी प्रभागातील प्रत्येक सर्वसामान्य नागरिक प्रयत्नशील आहे. या प्रभागातील शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक देखील निरपेक्ष भावनेने मन लावून प्रचारात उतरत त्यांच्या विजयासाठी प्रामाणिक प्रयत्न करताना दिसत आहेत.

# प्रभाग १० मध्ये गिरिजा अरुण गोफणे यांच्या प्रभावी प्रचारामुळे शरदचंद्र पवार पक्षाच्या तुतारीने मतदारांचे मन जिंकले

## अरुण गोफणे यांची सक्षम प्रचार यंत्रणा आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद गिरीजा गोफणे यांच्या विजयासाठी आशादायक

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक दहा मध्ये दिवसेंदिवस प्रचाराची चुरस वाढताना दिसत असूनही या प्रभागातून शरदचंद्र पवार पक्षाच्या तुतारी चिन्ह घेऊन निवडणूक लढवत असलेल्या गिरीजा अरुण गोफणे यांनी प्रत्येक सर्वसामान्यांमध्ये मिसळून आपल्या प्रचाराला सुरुवात केल्यामुळे त्यांच्या प्रचाराला मोठा जनाधार मिळताना दिसत आहे. अरुण गोफणे हे प्रभाग क्रमांक दहा मधील गेल्या पंधरा वर्षापासून राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले युवा व्यक्तिमत्व आहेत. गतवेळी त्यांनी निवडणूक लढवत पहिल्याच प्रयत्नात मोठे मतदान खेचून घेतले होते. त्यांच्या मतदान खेचून घेण्यामुळे काही दिग्गज उमेदवारांना पराभवाचा फटका बसला होता.





यावेळी गिरीजा गोफणे आणि अरुण गोफणे या दांपत्याने या प्रभागातील गाढवे वस्ती माने वस्ती या परिसरात असलेल्या स्नेहांसमवेत संपर्क साधून प्रचाराची रणनीती मोठ्या प्रमाणात यशस्वी केली आहे. अरुण गोफणे हे बांधकाम क्षेत्रात सक्रिय असल्यामुळे बांधकाम कामगारांशी त्यांचा मोठा परिचय वर्ग आहे. याशिवाय या प्रभागातील शहरी भागात त्यांचा अनेक घटकांशी नित्य संपर्क असल्यामुळे त्यांच्या सुविदय पत्नी गिरीजा गोफणे यांना त्याचा मोठा फायदा होताना दिसत आहे. शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्ह्याचे सर्वेसर्वा खासदार धैर्यशील मोहिते पाटील, मोहोळ चे माजी आमदार तथा सिंघम नेते रमेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अरुण गोफणे यांनी प्रचार अभिनव पद्धतीने करत जनसंवाद दौरे प्रभाग बैठका त्याचबरोबर डोअर टू डोअर प्रचारावर भर दिला आहे.

पक्षाचे चिन्ह तुतारी प्रत्येक सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करत असताना पक्षाची विकास धारा आणि विचारधारा त्याचबरोबर पक्षाचा विकासनामा आणि वचननामा मुद्रित स्वरूपात प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवण्यामध्ये गिरिजा अरुण गोफणे यांना यश मिळाले आहे. त्यामुळे गिरीजा गोफने यांचा प्रभागातील विजय निश्चित मानला जात आहे. या प्रभागातील सर्वसामान्यांचा उमेदवार म्हणून गिरीजा गोफणे यांच्याकडे पाहिले जात असून दिग्गज पक्षाच्या अनेक मातब्बर उमेदवारांना बाजूला सारत मतदारांनी गिरीजा गोफणे यांना प्रतिसाद द्यायला प्रारंभ केल्यामुळे अनेक दिग्गज उमेदवारांच्या पायाखाली वाळू सरकली आहे. त्यामुळे गिरीजा गोफणे यांची उमेदवारी महत्त्वाची ठरत असून अरुण गोफने यांच्या संपर्क यंत्रणेच्या माध्यमातून त्यांचा विजय आता निश्चित मानला जात आहे.

# निवडणुका होणारच, स्थगिती नाही

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर SC चा मोठा निर्णय

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 50 टक्के आरक्षणाची मयार्दा ओलांडल्याच्या आक्षेपावर आज शुक्रवारी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण तीन न्यायाधीशांकडे सुनावणीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पुढील सुनावणी 21 जानेवारीला ठेवण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांना स्थगिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. 288 नगरपरिषदा,नगरपंचायतींच्या निवडणुका घोषणेप्रमाणे होणार आहे. 50 टक्क्यांची आरक्षण मयार्दा ओलांडलेल्या निवडणुका आदेशाधीन राहणार, असं सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे. राज्यातील 40 नगरपरिषदा आणि 17 नगरपंचायतींमध्ये 50 टक्के आरक्षणाची मयार्दा



ओलांडली गेल्याची कबुली राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दिली होती. त्यानंतर आज सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित सुनावणी पार पडली.

### सर्वोच्च न्यायालयाने आजच्या सुनावणीत काय काय सांगितलं?

सर्वोच्च न्यायालयाने आजच्या सुनावणीत म्हटलं आहे की, 'मनपा, जि.प आणि पं. समित्यांच्या निवडणुकांना विलंब नको व्हायला. आरक्षण मयार्दा ओलांडलेल्या स्था.स्व.संस्थांच्या निवडणुका आमच्या आदेशाधीन आहेत. त्यामुळे पुढील सुनावणी 21 जानेवारीला असेल आणि त्यावेळी तीन न्यायमूर्तींचं खंडपीठ असेल', असंही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. तसेच, 'राज्यातील 247 नगरपालिका आणि 42 नगरपंचायती अशा 288 स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये होत असलेल्या निवडणुका घोषित झाल्याप्रमाणे होऊ द्या. कोणत्याही निवडणुकांना आम्ही स्थगिती देत नाहीयत. बांठिया आयोगाचा अहवाल आम्हीही वाचला नाही, पण सध्या त्यालाच आधार मानतायत. 50 टक्क्यांची आरक्षण मयार्दा ओलांडलेल्या सर्व ठिकाणच्या निवडणुका आमच्या आदेशाधीन राहणार. मनपा, जि.परिषदा, पं. समित्यांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण नको', असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

### निवडणुकीचे प्रचार कधी थांबतील?

निवडणूक आयोगाच्या 4 नोव्हेंबर 2025च्या एकत्रित आदेशातील आचारसंहितेबाबत तरतूद सुधारित करण्यात आली आहे. त्यानुसार आता मतदान सुरु होण्याच्या दिवशीच्या आदल्या दिवशी रात्री 10 वाचता प्रचाराची सांगता होणार आहे. म्हणजे, 2 डिसेंबर 2025ला मतदान पार पडत असल्यानं आदल्या दिवशी म्हणजे, 1 डिसेंबर 2025 ला रात्री 10 वाजता प्रचारकार्यक्रम थांबणार आहेत.